Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- X | ISSUE- IV | APRIL | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# महात्मा बसवेश्वरांचे अस्पृश्यतेविषयक विचार

**श्रीमती थळकरी अश्विनी अशोक**
(सहशिक्षिका)
श्रीशैल मल्लीकार्जुन विद्यामंदीर,
कोळगाव समसापूर ,जि. लातूर.

महात्मा बसवेश्वर हे समग्र सामाजिक समतावादाचे विशेष समर्थक होते. अस्पृश्यता निर्मूलन संदर्भातील महात्मा बसवेश्वरांचे कार्य अनेक दृष्टींने योगदानकारक ठरलेले आहे. बाराव्या शतकासारख्या काळात अस्पृश्यतेला मुठमाती देणाऱ्या बसवेश्वरांच्या विचाराचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

महात्मा बसवेश्वर हे कर्नाटकातील कल्याण राज्याचे पंतप्रधान होते. आपल्या राज्यात त्यांनी समाजकल्याणाचे विविध उपक्रम राबविले होते. माणसामाणसात भेद करणाऱ्या, त्यांना तुच्छ लेखणाऱ्या भेदनितीला खतपाणी घालणाऱ्या अस्पृश्यतेचा त्यांनी कडाडून निषेध व विरोध केला. कुलीन कोण? व अस्पृश्य कोण? हे सांगताना बसवण्णा म्हणतात,

*"हत्या करणारा मांग आहे*
*घाण खाणारा महार आहे*
*कुल म्हणजे काय? त्याने काय होणार?*
*सकल जीवांचे कल्याण इच्छिणारे*
*आमच्या कुडलसंगाचे शरण श्रेष्ठ कुलीन"[1]*

अर्थात, कुठल्याही स्वरुपातील हत्या करणारा हा मांग आहे. अभक्ष भक्षण करणारा हा महार आहे. कारण असे कृत्य करणारेच खऱ्या अर्थाने अस्पृश्य आहेत. जन्माने अस्पृश्यता न ठरविता ती कर्माने ठरविली गेली पाहीजे. अशी अस्पृश्यतेची वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना बसवेश्वर मांडतात.

**स्पर्शाने विटाळ होतो या कल्पनेची टर उडविली :**

तत्कालीन समाजामध्ये अस्पृश्यांची स्थिती अत्यंत करुणाजनक होती. अस्पृश्यांना गावच्या शिवेबाहेर रहावे लागते. या पद्धतीचा बसवण्णांनी विरोध केला. स्पर्शाने विटाळ होतो या कल्पनेची टर उडविताना बसवेश्वरांनी 'चन्नया' या हरिजन भक्ताच्या नौकराचा मी अवैध पुत्र आहे असे ठासून सांगितले.[2] अस्पृश्य जर भक्त झाला तर मी त्याचा गौरव करेनच त्याचबरोबर त्याच्या पाळीव कुत्र्यांचीही मिरवणूक काढून त्याचाही गौरव करेन असे सांगताना बसवण्णा म्हणतात,

*"महार-मांग भक्त असतील तर त्यांच्या घरच्या*
*कुत्र्याचा पंचमहावाद्यानी सन्मान करतो..."[3]*

कल्याण शहराच्या शिवेबाहेर हरिजन राहत. याच वस्तीत नागीदेव उर्फ शिवनागय्या नावाचा अस्पृश्य राहात होता. तो लिंगायत धर्माचे आचरण करत होता. बसवेश्वरांनी त्याच्या घरी जेवण केले. म्हणजेच बसवेश्वरांनी स्वतःच्या विचाराप्रमाणे आचरणही केले. बसवविचाराने प्रभावित झालेला शरण 'चौदय्या' हा नावाडी आपल्या वचनातून म्हणतो, मातेला वाईट वागणूक देणारा जातीभ्रष्ट असतो. पित्याला छळणारा, दुसऱ्याच्या पत्नीवर प्रेम करणारा, रस्त्यावर काटे टाकणारा हे सर्वच गावातले अस्पृश्य असून आपल्याला त्यांचा उपयोग नाही. उलटपक्षी गावाबाहेरचे अस्पृश्य समाजाला उपायकारक ठरतात. कारण हेच लोक जोडे, सुंब, चाबूक आणि नावा अशा उपयुक्त वस्तू बनवून देतात.[4]

**मंदिरात जावून पूजा करण्याची आवश्यकता नाही :**

बाराव्या शतकात मंदिरे ह्या प्रस्थापित धार्मिक आणि सामाजिक संस्थाच होत्या. धनीक लोक अमाप संपत्ती खर्चून मंदिरे उभारत. बसवेश्वरांना मंदिरे म्हणजे धनिकांचा आणि धार्मिक माथेफिरूंचा विपर्यस्त सामाजिक व्यवहार वाटे. कर्मकांडी मंडळी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देत नव्हते. बसवेश्वरांनी मंदिरांवर व तिथल्या पुजा अर्चावर बहिष्कार घातला.[5] अस्पृश्य हे गरीब असल्यामुळे मंदीर उभारू शकत नव्हते. बसवेश्वरांनी आपल्या अनुयायांना सक्त ताकीद दिली की मंदिर बांधू नये आणि मंदिरात जावून पुजा करू नये.

इष्टलिंगाच्या रुपाने आपण आपल्या शरीरावरच ईश्वर धारण केल्यामुळे पुजेची गरज नाही असे सांगून बसवण्णा म्हणतात,

*"भव्य शिवालय बांधीती सधन*
*गरीब मी सान बांधू कैसे?*
*पाय माझे खांब, देह हेची देवालय,*
*शिर हेची कळस होय, सोनियाचे*
*कुडलसंगमदेवा, ऐका हो कृपावंत*
*स्थावर असे नाशिवंत, जंगम नसे नाशिवंत."*[6]

तसेच बसवेश्वर म्हणतात मंदिर स्थावर, अचल आहे म्हणून ते स्थितीशिलतेचे आणि मृत्यूचे द्योतक आहे. आपल्या देहालाच देवालय करा. कारण भक्ताचे ईश्वरप्रेम हे समाजात जाहीर होत नसते तर ते एकांतात भक्ताच्या ईश्वर चिंतनात त्याची प्रचिती येत असते.

**मानवाचा 'माणूस' म्हणून गौरव झाला पाहीजे :-**

बाराव्या शतकात बसवेश्वरांनी क्षमताप्रणित आदर्श समाजनिर्मितीचा प्रयत्न केलेला आहे. बसवेश्वरांचे समाजशास्त्र कोणताही भेदभाव मानत नाही. 'सर्व मानव समान आहेत' ही समग्र समतावादी जाणिव बसवण्णांनी दृढमूल केली. प्रत्येक मानवाचा माणूस म्हणून सदोदीत गौरव झाला पाहिजे असा महात्मा बसवेश्वरांचा आग्रह राहिलेला आहे. सर्वजण परमेश्वराची लेकरे आहेत, सर्वजण आपलेच आहेत हा समभाव, समताभाव व मानवताभाव व्यक्त करताना बसवेश्वर म्हणतात,

*"हा कोण? हा कोण? हा कोण?*
*असे म्हणू नका देवा*
*हा आमचा, हा आमचा, हा आमचा*
*असे म्हणवावे देवा*
*कुडलसंगमदेवा, आपल्या घरचा पुत्र म्हणवावे मला."*[7]

या पार्श्वभूमीवर महात्मा बसवेश्वर सर्वार्थाने प्रथम कृतीशील अस्पृश्योद्धारक ठरतात.

**अस्पृश्यता पाळणे म्हणजे देवाचाच अपमान होय:**

मध्ययुगीन काळात अस्पृश्यांची स्थिती अत्यंत करुणास्पद होती. मुंग्यांना साखर टाकणारे, नागाला दूध पाजणारे, वृक्षपूजा करणारे, गोमुत्र पवित्र समजणारे लोक अस्पृश्यांच्या सावलीने मात्र बाटत. माणूस असून समाजात अस्पृश्यांना अत्यंत हीन दर्जाची वागणूक दिली जात. बसवेश्वरांनी मानवतेला काळीमा फासणाऱ्या अशा ढोंगी लोकांचा विरोध केला. बसवेश्वर म्हणतात अस्पृश्यता पाळणे हा केवळ मानवप्रतीच अन्याय नव्हे तर सर्वांचा निर्माता असलेल्या प्रत्यक्ष देवाचा अपमान करणे होय.[8]

**अस्पृश्यांशी जीवाभावाचे संबंध जोडले :**

महात्मा बसवेश्वरांनी अस्पृश्यता मानणाऱ्यांचा धिक्कार केला. आपण अस्पृश्यांच्याच गोत्राचे आहोत असे ते अभिमानाने सांगत. ते म्हणतात,

*"कुळगोत्र विचारता का मौन बाळगता?*
*मान खाली घालून विचार कसला करता*
*मांग चन्नय्याच्या गोत्राचा आहे मी*
*अभिमानाने का नाही सांगत? कुडलसंगमदेवा"*[9]

**देशाची प्रगती करायची असेल तर अस्पृश्यतेचा नाश महत्त्वाचा :-**

अस्पृश्यतेचा नाश झाला तरच जातियतेचा नाश होतो आणि जातियता निःशेष झाल्यास सामाजिक क्रांती यशस्वी होते. सामाजिक क्रांती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही हे बसवण्णांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी भारतीय समाजात प्रचलित अस्पृश्यता नष्ट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अस्पृश्यता निर्मूलन करण्यातच राष्ट्राचा उद्धार असल्याचे जाणलेले बसवेश्वर हेच प्रथम पुरूष होत.[10]

**बसवधर्माचा पायाच अस्पृश्योद्धार आहे :-**

महात्मा बसवेश्वरांनी दिलेले इष्टलिंग धार्मिक व राजकीय समानतेचे व प्रतिष्ठेचे प्रतिक बनले. धर्म, वर्ण, वंश, लिंग, स्तर, स्पृश्य-अस्पृश्यता असा कुठलाही भेद न करता सर्वांना या इष्टलिंग देवाची उपासना करता येवू लागली. लोकांचा भक्तिमार्ग सोपा झाला. लिंगधारी व्यक्तीची पूर्वाश्रमीची जात नष्ट होवून ते लिंगायत बनले. त्यांच्यात कोणताही भेदभाव उरला नाही. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहारही होऊ शकत होता.

**लिंगधारणा न करणारे अस्पृश्य आहेत :-**

*"चतुर्वेदी असला तरी काय झाले*
*लिंगधारणा न करणारा अस्पृश्य आहे..."*[11]

या वचनाद्वारे बसवेश्वर स्पष्ट करतात की, कोणी कितीही ज्ञानी व कितीही श्रेष्ठ असला तरी जर त्याने लिंगधारणा केली नसेल तर मात्र तो अस्पृश्यच आहे. असे म्हणण्यात स्पृश्य-अस्पृश्यतेची रूढ भावना नाश करणे हेच बसवेश्वरांचे ध्येय होते असे दिसून येते.

**स्पृश्य-अस्पृश्य विवाह समर्थन :-**

महात्मा बसवेश्वरांनी सर्व मानव समान आहेत, त्यांच्यात कसलाच भेदभाव करू नये असा समतावादी विचार मांडला. एवढेच नव्हे तर त्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्नही केले. त्यापैकी एक म्हणजे बसवेश्वरांनी स्पृश्य-अस्पृश्य यांच्यातील विवाहाचे केलेले समर्थन होय.

अनुभव मंटपातील पूर्वाश्रमीचे चांभार हरळय्या यांचा मुलगा 'शिलवंत' व पूर्वाश्रमीचा ब्राह्मण मधुवय्या यांची मुलगी 'रत्ना' (कलावती, लावण्य) यांचा विवाह लावला. 12 व्या शतकातील ही घटना क्रांतिकारक अशीच होती. सनातन्यांनी बसवेश्वर धर्म बुडवित असल्याचा आरोप करत कांगावा केला. परंतु बसवेश्वरांनी या विवाहाचे समर्थन केले. त्यांच्या म्हणण्यानुसार हा विवाह आंतरजातीय वाटत असला तरी ते दोघेही आता समान आहेत. कारण ते आता लिंगायत आहेत. लिंगायत झाल्यानंतर त्यांची पूर्वाश्रमीची जात आपोआप नष्ट होऊन जाते. त्यामुळे त्यांचा विवाह योग्यच आहे असे बसवेश्वरांनी समर्थन केले.

**निष्कर्ष :-**

12 व्या शतकात समतावादाची स्थापना करण्याचे ध्येय उराशी बाळगून बसवेश्वरांनी अस्पृश्यता निवारणार्थ अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले. त्या काळात खूप मोठ्या मानवी समुदायास मानाचे व प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची संधी प्राप्त झाली. नाहीतर हा अस्पृश्य म्हटला गेलेला समुदाय पशुपेक्षाही हीन दर्जाचे जीवन जगत होता. त्यांचे जीवन म्हणजे धरतीवरील नरकयातनाच होत्या. त्यांना यातून मुक्त करण्याचे प्रत्यक्ष कार्य बसवेश्वरांनी केले. त्याचा परिणाम आज 21 व्या शतकात कुठे ना कुठे तरी कमी-अधिक प्रमाणात का असेना अस्पृश्यता लोप पावत असलेली दिसून येत आहे.

**संदर्भ :-**

1) दोडमनी, शालिनी, महामानव बसवण्णांची समग्र वचने, दोडमनी, श्रीशैल्य, बेळगाव, 2007, पृ. 77.
2) जिरोबे, राजेंद्र, विश्वमंगल महात्मा बसवेश्वर वचनसुधा, कलबुर्गी, शिवशरणप्पा, गुलबर्गा, 2007, पृ. 51.
3) दोडमनी, शालिनी, उ. नि., पृ. 77.
4) चिदानंदमुर्ती, एम.,किंबहुने, रविंद्र (अनु.), श्री बसवेश्वर, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, 1991, पृ. 40.
5) तत्रैव, पृ. 38.
6) जिरोबे, राजेंद्र., उ.नि., पृ. 9
7) दोडमनी, शालिनी, उ.नि., पृ. 9
8) मेनकुदळे, डॉ. अशोक, गंगाधर, 12 व्या शतकातील आद्यसमाजसुधारक महात्मा बसवेश्वर, सुविधा प्रकाशन, सोलापूर, 2003, पृ. 60
9) तत्रैव, पृ. 61
10) जवरे गौडा, डॉ. दे., मडकी, शशिकला (अनु.), महात्मा बसवेश्वर व डॉ. आंबेडकर, बसवधर्म प्रसार संख्या, हिरेमठ संस्थान, भालकी, 2008, पृ. 32
11) दोडमनी, शालिनी, उ.नि., पृ. 79.